स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

संशोधन आराखडा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेअंतर्गत राज्यशास्त्र विषयातील पीएच. डी. पदवीकरिता सादर करण्यात येणारा शोध प्रबंधाचा आराखडा

संशोधन विषय

भारतीय परराष्ट्र धोरणात पंतप्रधान नरेंद्र मोदीचे योगदान : एक अभ्यास

संशोधक विद्यार्थी

यल्लावाड ज्ञानेश्वर प्रल्हाद

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

संशोधक मार्गदर्शक

प्रा. डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव

पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख

देगलूर महाविद्यालय, देगलूर

इ.स. २०१९

भारतीय परराष्ट्र धोरणात पंतप्रधान नरेंद्र मोदीचे योगदान : एक अभ्यास

प्रस्तावना :-

आजच्या युगातील जागतिक व्यवस्थेत सर्व देश परस्परांशी संबंध ठेवण्याचा प्रयत्न करतात. कारण कोणताही देश स्वयंपूर्ण नाही. त्यामुळे प्रत्येक देशाला एकमेकांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतर देशाशी व्यवहार करावेच लागतात. सर्व देशांना परस्परांशी सामाजिक, आर्थिक, लष्करी, सांस्कृतिक, राजकीय इ. प्रकारचे संबंध ठेवावे लागतात. कारण परराष्ट्र धोरणामुळे एक निश्चित दिशा प्राप्त होऊन त्यांना आपली उद्दिष्टय साध्य करता येतात. म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणात परराष्ट्रधोरणाला महत्व आहे. प्राचीन काळापासून प्रत्येक देशाने आपल्या गरजा पूर्ण करण्यासाठी इतर देशाबरोबर व्यवहार केलेले दिसून येते. कौटिल्याचे "अर्थशास्त्र", मॅकव्हिलीच्या "द प्रिन्स"या ग्रंथामध्ये परराष्ट्रधोरणाची बीजे दिसून येतात. मध्ययूगीन काळात फ्रेंच राज्यक्रांती (१७८९), अमेरिकन राज्यक्रांती (१७७६), औद्योगिक क्रांती, रशियन क्रांतीचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणावर पडलेला होता. याशिवाय आशिया, आफ्रिका, अमेरिका, यूरोप, अरब राष्ट्राशी भारताचा व्यापाराच्या दृष्टीने संबंध आलेला दिसून येतो.

विसाव्या शतकापासून परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासाला शास्त्रशुद्ध पध्दतीने प्रारंभ झाला. पहिल्या महायुद्धानंतर राष्ट्रीय हित साध्य करुन साम्राज्यवाद व वसाहतवाद, शस्त्रास्त्र स्पर्धा विस्ताराला जास्तच प्रोत्साहन दिले गेले म्हणून आंतरराष्ट्रीय राजकारणात गटबाजी, मतभेद, संघर्ष, यूद्धजन्य परिस्थिती, हस्तक्षेप खूप मोठया प्रमाणात वाढलेल्या होत्या. परंतु सर्व देश राष्ट्रहित व आर्थिक विकासाला प्राधान्य देत होते. राष्ट्रहित हे परराष्ट्रधोरणाचा गाभा आहे. देशाचे परराष्ट्रधोरण जेव्हा सक्रीय होत असते. तेव्हाच आंतरराष्ट्रीय राजकारणास गती प्राप्त होते. फेलिक्स ग्रॉस यांचे "फॉरीन पॉलिसी अनॅलिसिस" आणि जॉर्ज मॉडेलस्की यांच्या "ए थेअरी ऑफ फॉरीन पॉलिसी" या ग्रंथात परराष्ट्र धोरणाचे विश्लेषणात्मक व वर्णनात्मक पध्दतीने विवेचन केले आहे.

खऱ्या अर्थाने विसाव्या शतकात परराष्ट्र धोरणाच्या अभ्यासाला गती प्राप्त झाली. कारण दुसऱ्या महायुद्धानंतर छोटी-मोठी राष्ट्र स्वतंत्र झाली. जग दोन महासत्तामध्ये विभागला गेला. एकगट (साम्यवाद) रशियागट, दुसरा गट (भांडवलशाही-लोकशाही) अमेरिका गट निर्माण होऊन शीतयुद्धास प्रारंभ झाला होता. याचवेळेस भारताला स्वातंत्र्य मिळालेले होते. भारताने कोणत्याही महासत्ता व लष्करी गटात सामिल न होता अलिप्तता स्वीकारले. त्यामुळे भारतीय परराष्ट्र धोरणाला एक नवीन दिशा मिळाली. भारतीय परराष्ट्रधोरणाची पायाभरणी करण्याचे श्रेय पंडित नेहरु यांच्याकडे जाते. म्हणून पंडित जवाहरलाल नेहरुना भारतीय परराष्ट्र धोरणाचे शिल्पकार म्हणतात. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर भारताने परराष्ट्र धोरणाचे निर्धारण केले. भारताच्या परराष्ट्र धोरणाची प्रारंभिक अभिव्यक्ती भारतीय राज्यघटनेतील नितीनिर्देशक तत्वांच्या कलम ५१ मध्ये करण्यात आली. यामध्ये राज्याला असे निर्देश करण्यात आले की आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षासाठी प्रयत्न केला पाहिजे.

• परराष्ट्र धोरणाचा अर्थ

१) जॉर्ज मॉडेल्सकी यांच्या मते, "इतर देशाच्या वर्तणूकीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी आणि आपले व्यवहार आंतरराष्ट्रीय वातावरणास सुसंगत बनविण्यासाठी देशानी ठरविलेले धोरण म्हणजे परराष्ट्र धोरण होय"

२) प्रो. चार्लस बर्टन मार्शल यांच्या मते, "परराष्ट्र धोरण म्हणजे राजसत्तेने आपल्या क्षेत्राबाहेरील परिस्थितीला प्रभावित करण्यासाठी विचारपूर्वक आखलेली कृती योजना होय".

३) परराष्ट्र धोरण म्हणजे एका राष्ट्राद्वारे दुसऱ्या राष्ट्राबाबत स्विकारलेले धोरण.

• भारतीय परराष्ट्र धोरण

भारतीय परराष्ट्र धोरणाची आखणी व पायाभरणी पंडित नेहरुच्या काळात झाली. अमेरिका व रशिया या दोन महासत्तामध्ये जग विभागला गेला. परंतु भारताने या दोन्ही महासत्तामध्ये सामील न होता अलिप्ततावाद स्विकारले. इ.स. १९५५ मध्ये भारताचे पंडित जवाहरलाल नेहरु, युगोस्लव्हियाचे मार्शल टिटो, मिस्त्रचे अब्दूल नासेर हे अलिप्ततावादी

संघटनेचे संस्थापक होते. १९६१ मध्ये बेलग्रेड येथे अलिप्ततावादी संघटनेचे पहिले शिखर संम्मेलन झाले. २९ एप्रिल १९५४ मध्ये भारताचे पंडित नेहरु व चीनचे चाऊ-एन-लाई यांच्यामध्ये पंचशील करार झाला. आज अलिप्ततावाद व पंचशील तत्व हे भारतीय परराष्ट्र धोरणाचे मुलतत्व आहेत. पंडित नेहरुनी विश्वबंधुत्व, शांतता, निःशस्त्रीकरण याचे समर्थन केले आहे. औद्योगिक विकास, व्यापार, रोजगार निर्मिती, काश्मीर प्रश्न, इराणचे कच्चे तेल, पाण्याची समस्या, सामरिक करार, आर्थिक गुंतवणूक, शेजारील देशाशी सहयोग व मैत्रीचे संबंध ठेवणे हे नेहरु काळात झालेले दिसून येते.

भारत व चीन दरम्यान १९६२ चे यूद्ध व शिमला करार, १९६५ चे पाकिस्तान व भारत युद्ध आणि ताश्कंद करार, भारतीय रुपयाचे अवमुल्यन, हरितक्रांती, १९७१ चे भारत व बांग्लादेश यूद्ध, भारत व रशिया मैत्री करार, १९७४ ची आण्विक पोखरण चाचणी -I, C.T, BT, करार, NPT करार, सार्क संघटनेतील सहभाग, आंतरराष्ट्रीय संघटनेतील सदस्यत्व LPG नवीन आर्थिक धोरण, इ. विविध बाबीचा प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणावर झालेला आहे. तेव्हा भारतीय परराष्ट्र धोरणाचा प्रभाव जागतिक राजकारणावर पडलेला दिसून येतो. भारताचे परराष्ट्र धोरण स्थिर नसून सतत बदलत गेलेले दिसून येते.

भारताच्या परराष्ट्र धोरणाला नवी दिशा प्राप्त झाली. Look East Policy, गुजराल सिध्दांत, Look west policy, कारगील युद्ध, पोखरणची आण्विक चाचणी-II, संयूक्त राष्ट्र संघटनेतील भारताची भूमिका, भारत व अमेरिका आण्विक करार, पेट्रोल व डिझेलचे करार, अन्नधान्य आयात व निर्यात, शांती सेनेची कामगिरी, ब्रिक्स संघटनेची स्थापना, दहशतवाद्यांना फाशीची शिक्षा इत्यादीमुळे भारतीय परराष्ट्र धोरण राष्ट्रहित, राष्ट्रीय शक्तीत वाढ करण्यात थोडयाफार प्रमाणात का होईना यशस्वी झालेले दिसून येते. याशिवाय दहशतवादाचा मूकाबला आर्थिक विकास, पर्यावरण संरक्षण, व्यापार, जनकल्याण योजना, आरोग्य शिक्षण, रोजगार, पर्यटन, दळणवळण व्यवस्था, विज्ञान व तंत्रज्ञान, थेट परकीय गुंतवणूक, ऊर्जा व आण्विक करार, इत्यादी विविध गोष्टी आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताशी झ ालेल्या आहेत. त्याचा संबंध भारतीय परराष्ट्र धोरणाशी आलेला आहे.

पं. नरेंद्र मोदीच्या कालखंडामध्ये भारतीय परराष्ट्र धोरणाचा विकास अत्यंत नियोजनपध्दतीने घडून येत असल्याचे दिसते. मोदी कालखंडामध्ये ज्या देशापर्यंत भारत आजपर्यंत पोहचला नव्हता अशा देशापर्यंत संबंध प्रस्थापित करण्यात आला. भारतीय परराष्ट्र धोरणाची तूलनात्मक दृष्टीने इतिहासात डोकावून पाहता ही कामगिरी ऐतिहासिक स्वरुपाची आहे. नेबर फार्स्ट नीति, एक्ट ईस्ट पॉलिसी, डोकलाम विवाद, सर्जिकल स्ट्राइक, असैन्य परमाणू करार, सोलार अलायन्स लीडरशीप, राफेल करार, दहशतवादाचा मुकाबला, मेक-इन इंडिया, कालाधन, नोटाबंदी, जी.एस.टी. पूलवामाचा बदला घेणे, एअर स्ट्राइक, मोहमद अझारला आंतरराष्ट्रीय दहशतवादी घोषित करण्यास भारताचे प्रयत्न, बिमेस्टेक संघटनेची स्थापना, विदेशी दौरे, आर्थिक विकासाचे प्रयत्न इत्यादी विविध बाबीचा आंतरराष्ट्रीय पातळीवर परिणाम झालेला आहे. भारताने राष्ट्रीय हित, आक्रमक सुरक्षा व कुटनिती, राष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक विकास साध्य केले. मोदी कालखंडात परराष्ट्र धोरणाचे निर्णय हे ऐतिहासिक स्वरुपाचे होते.

•संशोधन विषयाची आवश्यकता/महत्व :

भारतीय परराष्ट्र धोरणाला अनन्यसाधारण असे महत्व प्राप्त होत आहे. दहशतवाद, पर्यावरण समस्या, स्त्रीवाद, पाणी समस्या, ऊर्जा समस्या, पेट्रोल, डिझेल, गॅस, नैसर्गिक साधनसंपत्ती, अन्नधान्य पूरवठा, कुपोषण, दारिद्रय, गरिबी, आरोग्याच्या समस्या, बेरोजगारी, शैक्षणिक समस्या, संरक्षण आर्थिक अडचणी, दळणवळणाची समस्या, विज्ञान व तंत्रज्ञान इ. अनेक प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी परराष्ट्र धोरणाची भूमिका महत्वाची असते. म्हणून आधुनिक काळात कोणताही देश स्वयंपूर्ण नाही. त्यामुळे प्रत्येक देशाला एकमेकांच्या गरजापूर्ण् करण्यासाठी इतर देशाशी व्यवहार करावेच लागतात. सर्व देशांनी परस्परांशी सामाजिक, आर्थिक, लष्करी, सांस्कृतिक, राजकीय इ. प्रकारचे संबंध ठेवावे लागतात. कारण परराष्ट्र धोरणामुळे एक निश्‍चित दिशा प्राप्त होऊन त्यांना उदिदष्ट साध्य करता येतात. भारताच्या राष्ट्रशक्तीत वाढ करण्यासाठी परराष्ट्र धोरणाला खुप महत्व आहे. त्यासाठी प्रभावशाली व कणखर राजकीय नेतृत्वाची गरज असते. त्यावरच राष्ट्राचा विकास अवलंबून असतो

पं. नरेंद्र मोदी यांच्या इ.स. २०१४ ते २०१९ या पाच वर्षाच्या कालखंडात कशा प्रकारे परराष्ट्र धोरणाला एक नवी दिशा मिळाली, याशिवाय आर्थिक गुंतवणुक, लष्करी शक्तीत वाढ, वैज्ञानिक प्रगती, राष्ट्रीय हिताचे संरक्षण, दहशतवादाचा मुकाबला, पर्यावरण संरक्षणास प्रोत्साहन, मैत्री व सहकार्याचे संबंध, शांतता व विश्वबंधूत्वाचे धोरण इ. अनेक गोष्टी कशा पध्दतीने आंतरराष्ट्रीय पातळीवर साध्य केल्या. राजकीय नेतृत्व म्हणून पं. नरेंद्र मोदीचा प्रभाव आंतरराष्ट्रीय पातळीवर कसा पडला? भारताला प्रतिष्ठा, मान-सन्मान, उत्कृष्ट दर्जा प्राप्त करुन देण्यात कशा पध्दतीने प्रयत्न केले. पं. नरेंद्र मोदीनी जवळपास अनेक देशामध्ये १०० दिवसाचा दौरा करुन त्या देशाशी सलोख्याचे व मैत्रीचे सहकार्य वाढवले. भारतीय परराष्ट्र धोरण मजबूत झाले. त्यामुळे भारतीय जनतेचे प्रश्न व समस्या सोडविण्यास हातभार लागला. मोदीच्या कालखंडामध्ये भारतीय परराष्ट्र धोरणाचा विकास अत्यंत नियोजन पध्दतीने पाच टप्प्यामध्ये घडून येत असल्याचे दिसते. पहिला टप्पा दक्षिण अशियायी, दुसरा टप्पा दक्षिण पूर्व व मध्य आशियाशी, तिसरा टप्पा युरोपियन देशांशी, चौथा टप्पा अमेरिकेशी, तर पाचवा टप्पा आफ्रिकेशी निगडित आहे. याशिवाय ज्या देशापर्यंत भारत आजपर्यंत पोहचला नव्हता. अशा देशापर्यंत मोदी कालखंडात संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न झाला आहे. तुलनात्मक दृष्टया इतिहासात डोकावून पाहता ही कामगिरी ऐतिहासिक स्वरुपाची म्हणावी लागेल. म्हणून संशोधनाच्या निमित्ताने मोदी काळातील परराष्ट्र धोरणाचा विस्तृतपणे आढावा घेतला जाणार आहे. अशा विविध आंतरराष्ट्रीय पैलूचा भारतीय परराष्ट्र धोरणाशी आलेला संबंध याचा अभ्यास करावयाचा आहे.

म्हणून सदरील संशोधकाने “भारतीय परराष्ट्र धोरणातील पं. नरेंद्र मोदीचे योगदान” हा अभ्यासविषय संशोधन करण्यासाठी निवडला आहे.

संशोधन विषयाची उद्दिष्टये :

१) परराष्ट्र धोरणाची संकल्पना समजुन घेऊन मोदीपूर्वकालीन भारतीय परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.

२) पं. नरेंद्र मोदीच्या काळातील परराष्ट्र धोरणामुळे भारतीय राष्ट्रीय हित व शक्तीत झालेल्या वाढीचा अभ्यास करणे.

३) भारतीय परराष्ट्र धोरणाचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर पडलेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

४) पं. नरेंद्र मोदीच्या काळातील भारतीय परराष्ट्र धोरणाचा अभ्यास करणे.

५) प. नरेंद्र मोदीनी शेजारील व आंतरराष्ट्रीय स्तरावरील इतर अनेक देशासोबत कसे संबंध निर्माण केले ते तपासणे.

६) परराष्ट्र धोरणात नरेंद्र मोदीनी कोणता मार्ग व साधनाचा वापर केला ते जाणून घेणे.

७) पं. नरेंद्र मोदीच्या परराष्ट्र दौऱ्याचा अभ्यास करणे.

८) पं. नरेंद्र मोदींच्या व्यक्तीमत्वाच्या जडणघडणींचा अभ्यास करणे.

संशोधनाची गृहितके :

१) जागतिक पातळीवर भारतीय प्रतिष्ठा व मान-सन्मानात वाढ झाली.

२) आंतरराष्ट्रीय राजकारणावर भारतीय परराष्ट्र धोरणाचा प्रभाव पडला.

३) पं. नरेंद्र मोदीचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावशाली राजकीय नेतृत्व निर्माण झाले.

४) भारताचे अनेक देशाबरोबर मैत्री व सहकार्याचे संबंध निर्माण झाले.

५) पं. नरेंद्र मोदीने अनेक राष्ट्रासोबत आर्थिक, राजकीय, लष्करी, सामाजिक व सांस्कृतिक संबंध मजबूत करण्यावर भर दिला.

६) पं. नरेंद्र मोदीच्या काळात भारताच्या राष्ट्रीय हित व शक्तीत वाढ झाली.

७) पं. नरेंद्र मोदींच्या काळात भारतीय परराष्ट्र धोरणाला नवीन दिशा प्राप्त होऊन त्याची व्याप्ती वाढली.

संशोधन पध्दती :

कोणत्याही विषयाचा अभ्यास करताना शास्त्रीय स्वरुपात मांडणी करावी लागते. संशोधनात नित्य व नवा दृष्टीकोन महत्वाचा आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संशोधन विषय अभ्यासताना अनेक पैलू बाबत शास्त्रीय विवेचन करणे अगत्याचे ठरते. प्रस्तुत संशोधन

विषयाच्या अध्यनासाठी संख्यात्मक व गुणात्मक संशोधन पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे. यामध्ये प्रामुख्याने ऐतिहासिक, वर्णनात्मक व विश्लेषणात्मक पध्दतीचा वापर करण्यात येईल.

तथ्य संकलन :

अ) प्राथमिक स्त्रोत :-

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलन करण्यासाठी मुलाखत, प्रश्नावली, निरीक्षण इत्यादी माध्यमाचा वापर करण्यात येईल.

ब) द्वितीय स्त्रोत :-

संदर्भग्रंथ, अहवाल, दस्ताऐवज, शोधपत्रिका, नियतकालिक, वर्तमानपत्रे, इंटरनेट इत्यादी माध्यमाचा तथ्य संकलन करण्यासाठी वापर करण्यात येईल.

संशोधन विषयाची मर्यादा :-

प्रस्तुत संशोधन कार्यात वस्तुनिष्ठता येण्यासाठी व संशोधन वास्तवप्रत जाण्यासाठी संशोधनाचे क्षेत्र निश्चित करावे लागते. संशोधनाचे मर्यादित क्षेत्र हे संशोधकास वास्तवप्रत पोहचवते म्हणून शोधनिबंधातील संशोधनाच्या कार्यक्षेत्राला काही मर्यादा आहेत. भारतीय परराष्ट्र धोरणाची ऐतिहासिक पार्श्वभूमी आणि पंडित जवाहरलाल नेहरु ते पं. नरेंद्र मोदी यांच्या कालखंडापर्यंतचा थोडक्यात आढावा घेणे. तसेच हा विषय परराष्ट्र धोरणापूरताच मर्यादित राहील. “भारतीय परराष्ट्र धोरणात पं. नरेंद्र मोदीचे योगदाना” चा अभ्यास केला जाणार आहे. संशोधन कार्यात सुटसुटीत विषय मांडणी आणि विषयातील नेमकेपणा संशोधनाची दिशा स्पष्ट व्हावी. म्हणून संशोधनाची मर्यादा ठरविली आहे.

संशोधन आराखडा :-

कोणत्याही संशोधकापूढे संशोधन करताना निश्चित स्वरुपाचे उदिदष्ट डोळयासमोर ठेऊन संशोधकाला आपल्या संपूर्ण संशोधनाची आखणी किंवा मांडणी करावी लागते. कारण अशा पूर्व नियोजित मांडणीतून किंवा निर्णयामूळे संशोधन भटकत नाही व योग्य निष्कर्षाप्रत संशोधन पोहचण्यासाठी मदत होते. प्रस्तुत संशोधनाच्या शोध प्रबंधाचा आराखडा किंवा प्रकरण रुपरेखा खालीलप्रमाणे आहे.

प्रकरण १ : प्रस्तावना

प्रस्तुत शोधनिबंधाच्या पहिल्या प्रकरणामध्ये प्रस्तावना संशोधनाचे महत्व, संशोधनाची उद्दिष्टये, संशोधनाची गृहितके, संशोधनाची मर्यादा, संशोधन पध्दती, संशोधन आराखडा इत्यादीचा समावेश करण्यात येणार आहे.

प्रकरण २ : पंतप्रधान नरेंद्र मोदी पूर्वकाळातील भारतीय परराष्ट्र धोरण

या प्रकरणामध्ये परराष्ट्र धोरण म्हणजे काय? भारतीय परराष्ट्र धोरणाची उदिदष्टये, भारतीय परराष्ट्र धोरणाचे निर्धारक घटक, भारतीय परराष्ट्र धोरणाची मूलतत्वे पाहणे आवश्यक आहे. पं. पंडित नेहरु ते पं. नरेंद्र मोदी पूर्व काळापर्यंत भारतीय परराष्ट्र धोरणाचा आढावा घेण्यात येईल.

प्रकरण ३ : पंतप्रधान नरेंद्र मोदीच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण

पं. नरेंद्र मोदीचा राजकीय प्रवास कसा झाला? त्यांनी भारतीय राजकारणावर आपल्या व्यक्तीमत्वाचा प्रभाव कसा पाडला. पंतप्रधान नरेंद्र मोदीनी केलेली कामगिरी व योगदान पाहणे आवश्यक आहे. तसेच मोदीनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रभावशाली राजकीय नेतृत्व केले. अशा पध्दतीने एकंदरीत नरेंद्र मोदीच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण कशी झाली. या प्रकरणामध्ये पाहणार आहोत.

प्रकरण ४ : “भारतीय परराष्ट्र धोरणात पंतप्रधान नरेंद्र मोदीचे योगदान ”

प्रस्तुत शोधनिबंधात भारतीय परराष्ट्र धोरणात नरेंद्र मोदीचे योगदान या विषयावर सखोल व अभ्यास पूर्ण मांडणी केली जाणार आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील राजकीय नेतृत्व, भारतीय परराष्ट्र धोरणाला मिळालेली नवीन दिशा, अनेक राष्ट्रासोबत सहकार्याचे संबंध वाढविणे, भारताच्या राष्ट्रशक्ती व हितात वाढ, भारताशी जागतिक पातळीवर झालेल्या घडामोडी, आर्थिक, राजकीय, लष्करी, सामाजिक व सांस्कृतिक संबंध मजबूत करणे अशा विविध परराष्ट्र धोरणाशी संबंधीत घटकांचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण ५ वा

निष्कर्ष

प्रस्तुत प्रकरणामध्ये "भारतीय परराष्ट्र धोरणातील पं. नरेंद्र मोदीच्या कामगिरीचे मूल्यमापन करण्यात येणार आहे." शेजारील व इतर सर्व देशाशी सहकार्य व मैत्रीचे संबंध, विदेशी दौरे, व्यापार, राष्ट्रीय हित, राष्ट्रीय सुरक्षा, राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक धोरण, दहशतवादाला आळा घालणे अशा विविध धोरणांचा अभ्यास केला जाणार आहे.

उपरोक्त संशोधन आराखडयात संशोधन कालावधी दरम्यान उपलब्ध होणाऱ्या साहित्यानुसार बदल होऊ शकतो.

संशोधक विद्यार्थी

यल्लावाड ज्ञानेश्वर प्रल्हाद

महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालय, उदगीर

संशोधक मार्गदर्शक

प्रा.डॉ. लक्षटे रत्नाकर बाबुराव

पदवी व पदव्यूत्तर राज्यशास्त्र

विभाग प्रमुख

देगलूर महाविद्यालय देगलूर

संदर्भग्रंथ सूची

१)	शैलेंद्र देवळाणकर	भारताचे परराष्ट्र धोरण सातत्य व स्थित्यांतरे, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद - २०१०
२)	प्रशांत अमृतकर	आंतरराष्ट्रीय संबंध, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद-२०१०
३)	वसंत रायपूरकर	आंतरराष्ट्रीय संबंध, मंगेश प्रकाशन, नागपूर - २००८
४)	शिंदे ज.रा.	आंतरराष्ट्रीय संबंध,कैलाश प्रकाशन, औरंगाबाद- १९९८
५)	शैलेंद्र देवळाणकर	आंतरराष्ट्रीय संबंध, कैलाश प्रकाशन, औरंगाबाद-२०१०
६)	बी.एल . फाडिया	आंतरराष्ट्रीय सम्बन्ध, साहित्यभवन प्रकाशन, नवी दिल्ली २०१५
७)	जे.एन. दिक्षित	भारत की विदेश निति, प्रभात प्रकाशन, नई दिल्ली-२०१८
८)	खन्ना व्हि.एन.	भारत की विदेश निति, SBPD प्रकाशन, नई दिल्ली-२०१५
९)	पुष्पेश पंत	भारत की विदेश नीती - मॅग्रोहिल एज्यूकेशन, ११ जाने.२०१८.
१०)	सुमित गांगूली	भारत की विदेश नीती इ OUP प्रकाशन, ६ जाने. २०१८.
११)	Harsh V. Pant	Indian Foreign policy, New Delh, 2018
१२)	N.N. JHA, Sudhir Singh	Indian Foreign policy, Ibp books com, New Delhi, 2018

१३) लोकसत्ता, महाराष्ट्र टाईम्स, लोकमत, सकाळ व तरुण भारत

१४) प्रतियोगिता दर्पण, परिक्रमा, चाणक्यमंडल

१५) Internet (Narendra Modi of Indian foreign policy .